International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 18 May-June 2024

# सामाजिक पुनर्बांधणीत महात्मा ज्योतिबा फुले यांचे योगदान

**प्रा. डॉ . राजेंद्र यादोराव खंडाईत**
श्री.संताजी कला व विज्ञान महाविद्यालय पालांदूर (चौ.)
**Email:**rykhandait1971@gmail.com
**Corresponding Author - प्रा. डॉ . राजेंद्र यादोराव खंडाईत**
**DOI- 10.5281/zenodo.11655361**

**प्रस्तावना :-**

भारतीय प्रबोधन चळवळ आणि समाजसुधारणेच्या इतिहासातील एक अग्रगण्य क्रांतीकारक, समाज चिंतक म्हणून महात्मा ज्योतीराव फुले यांचा उल्लेख प्रामुख्याने केल्या जातो आणि विशेषतः आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत त्यांचे अत्यंत महत्वपूर्ण योगदान आहे. फुलेंनी सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय अशा अनेक विषयांवर परिवर्तनवादी, बंडखोर, बुद्धिवादी असे मार्मिक विचार मांडले. फुल्यांनी मांडलेले विचार तत्कालिन परिस्थितीत परिवर्तन घडविण्यासाठी तर उपयुक्त होतेच परंतु त्याच्या विचारातील मूलभूत सूत्र मात्र काळाला भेदून पुढे जाणारे आहेत. १९ व्या शतकात भारतात धार्मिक पुनरूज्जीवनावर आधारलेला राष्ट्रवाद उदयास येत होता तर दुसऱ्या बाजूने उच्चभु आंग्लविद्याविभूषीत नवतरूण सुशिक्षीतांमध्ये तर्ककर्कश शुद्ध बुद्धिप्रामाण्यवादाचा प्रभाव होता. महात्मा फुलेंची नाळ मात्र सर्वसामान्य बहुजन वर्गाशी जुळलेली होती. म्हणून त्यानी या दोन्हीही टोकाच्या भूमिका नाकारून सार्वजनिक सत्यधर्माचा मध्यम मार्ग समाजाला दिला.

“शिक्षण व समता” या दोन शब्दात त्यांच्या कार्याचे वर्णन करता येते .त्यांना महाराष्ट्राचे **“मॉर्टीन ल्युथर किंग”** म्हणून ओळखल्या जाते. प्रस्तुत शोध निबंधात महात्मा ज्योतीराव फुल्यांनी सामाजिक पुनर्बांधणीत जे कार्य केले त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**जीवन परिचय :-**

महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म इ. स. १८२७ मध्ये पुणे येथे झाला. फुले यांच्या घराण्याचे मुळगाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होय. त्यांचे मुळ उपनाव गोरे होते. क्षत्रीय जातीतील एक माळी समाजाचे होते. यासोबतच बारा बलुतेदारांपैकी चांगले बलुतेदार होते. घरची परिस्थिती अतिशय बिकट स्वरूपाचे असल्याने त्यांचे वडील गोविंदरावांनी शेळया राखण्याचा व्यवसाय केला. परंतू त्यांच्या मालकांनी त्यांचा प्रामाणिकपणा, हुशारी, कष्टाळूपणा पाहून त्यांना फुलांचा व्यवसाय शिकविले. त्यांनी फुलांचा व्यवसाय सुरू केल्याने त्यांचे उपनाव गोरे बदलून ते फुले या नावाने ओळखल जाऊ लागले. गोविंदरावाचा विवाह चिमणाबाई सोबत झालेला होता, व या उभयंताना ज्योतीबा व राजाराम हे दोन मुले प्राप्त झाली होती. ज्योतीबाचे वय एका वर्षाचे असतांना त्यांची आई चिमणाबाई मरण पावली होती. त्यामुळे आपल्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी चिमणरावांनी ज्योतीबाला सातव्या वर्षी एका खाजगी शाळेत पाठविले. तिथे त्यांना संस्कृत, व्याकरण, ज्योतीष्य वेदांत, धर्मशास्त्र इत्यादी शिक्षण दिले गेले. मात्र त्यावेळी शिक्षणासाठी पोषक वातावरण नव्हते. लोकांना शिक्षणाचे महत्व पटत नव्हते परिणामी त्यांच्या वडिलांनी त्यांना शाळेतून काढून टाकले. त्यामुळे ज्योतीबांच्या शिक्षणात खंड पडला असला तरी त्यांची शिक्षणाची ओढ कमी झालेली नव्हती. ते फावल्या वेळात वाचन करीत असत त्यांचा तेराव्या वर्षी धनगरवाडीच्या झाडे पाटील यांच्या सावित्रीबाई हया कन्येशी विवाह झाला. समाजसुधारण्याची चळवळ खेड्यापर्यंत पोहोचविणाऱ्या अशा थोर या महात्माचा मृत्यू इ.स. १८९० मध्ये झाला.

**शोध निबंधाची वैशिष्ट्ये :**

१) भारतीय सामाजिक सुधारणा चळवळीतील महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेणे.
२) स्त्रियांच्या सुधारणा व स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांच्या योगदान अभ्यासणे.
३) तत्कालीन समाज सुधारणा चळवळीचे स्वरूप अभ्यासणे.
४) भारतीय समाज व्यवस्थेत परीवर्तन करण्यासाठी महात्मा फुले यांच्या विचाराचे अवलोकन करणे.
५) समाज पुनर्बांधणीत त्यांनी केलेल्या कार्याचे परिणाम अभ्यासणे .

**संशोधन पद्धती :**

तत्कालीन समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणन्यासाठी महात्मा फुल्यांनी जे कार्य केले त्यांचे संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला असून तत्कालीन काल खंडातील मुळसंदर्भ ग्रंथ, प्राथमिक साधने यातून ही माहिती काढलेली आहे.

**महात्मा फुले यांचे सामाजिक पुनर्बांधणीतील कार्य :**

महाराष्ट्रातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची आणि सामाजिक दास्यांची मीमांसा करणारे पहिले समाज सुधारक म्हणून ज्योतिबा फुले अग्रस्थानी आहेत. टॉमसपेन (१७३७-१८०९) यांच्या "राईट्स ऑफ द मॅन " या ग्रंथापासून त्यांना समाज सुधारणेची प्रेरणा मिळाली. मानवी समता आणि स्वातंत्र्य या तत्वांवर आधारित नवा ध्येयवाद प्रस्थापित करण्यासाठी ज्योतीबांनी जीवाचे रान केले. जातीभेद हा खोटा आहे हे तत्व त्यांनी अनेक ठिकाणी स्पष्टपणे मांडले . ह्यांनी प्रचलित हिंदू धर्म संस्था तिच्यावर आधारीत समाज रचना आणि ब्रिटीश यांचे गुणावगुण जाणून घेऊन त्यांचा शुद्रावर (शेतकरी आणि दलितांवर) कोणता परिणाम होतो. याची मुलुगामी मीमांसा केली.शूद्रांना त्यांच्या दैनाव्यवस्थेतून बाहेर काढण्यासाठी लोकशिक्षण हा उपाय त्यांनी सुचविला.

विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेले
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले

हा जोतीबांच्या विचारांचा सारांश आहे.

**स्त्री उद्धाराचे कार्य :-**

तत्कालीन कालखंडाचा विचार करता समाजात स्त्रियांना कोणतेही मानाचे स्थान नव्हते. "चुल आणि मुलं" एवढे सिमित कार्य स्त्रियांनी करावे असे ठरविण्यात आलेले होते. त्यामुळे प्रथमतः महात्मा फुलेंनी स्त्री उध्दाराचे कार्य आपल्या हाती घेतले. व्यक्तीचे जीवन विकसीत करण्यासाठी शिक्षण हे प्रमुख साधन आहे. असे ज्योतीरावांचे मत होते. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणांचे मुळ आहे असे ते म्हणत. "जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उध्दारी", या तत्वाचे पाईक होते. मुलांच्या संस्काराचे तसेच कर्तव्याचे मार्गदर्शन स्त्री कडून होत असतांना तिच्या कर्तव्याची जाणीव तिला प्राप्त झाली तर कुटुंबाचा उध्दार व नंतर देशाची प्रगती आपल्याला साधता येईल असे ते म्हणत असत.

तत्कालीन समाजात बालविवाह, सती प्रथा, विधवा, केशवपन अशा अनेक अनिष्ट रूढी परंपरांना स्त्रियांना सामोरे जावे लागत होते. त्यांना भारतीय समाजाकडून तुच्छतेची वागणूक दिल्या जात होती. स्त्रियांचे सर्व अधिकार काढण्यात आलेले होते. कारण जेणेकरून उपभोग्य वस्तु म्हणून तिच्याकडे पाहण्याची प्रवृत्ती समाजात निर्माण झाली होती. म्हणून महात्मा ज्योतीबा फुले यांनी स्त्रियांच्या उध्दाराचे महत्वाचे कार्य हाती घेतले यासाठी त्यांना फार मोठे कष्ट सहन करावे लागले. स्त्री ही समाजाचे मुळ आहे, म्हणून ज्योतीरावांनी स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बाल हत्या, यासारख्या सामाजिक सुधारण्याच्या माध्यमातून स्त्रियांना मानाचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. यात महत्वाचा अडथळा म्हणजे शिक्षणाचा अभाव ही गोष्ट महात्मा फुल्यांनी अचूकपणे ओळखली होती. त्याच्या काळात स्त्रियांना शिकण्याचा अधिकार नव्हता. तत्कालीन समाजाचा स्त्री शिक्षणासंबधीचा दृष्टीकोन अतिशय अनुदार होता. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण मिळाल्या खेरीज त्यांचा उद्धार होणे शक्य नाही. असा ज्योतीबांचा ठाम विश्वास होता त्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य प्रथम हाती घेतले.

**पहिली भारतीय शिक्षिका घडविली:-**

इ.स. १८४८ मध्ये पुणेच्या बुधवार पेठेत भिडयाच्या वाडयात जोतीरावांनी मुलींची पहिली शाळा काढली या शाळेत ज्योतिबा स्वत: शिक्षक

म्हणून काम करित होते. परंतु तत्कालीन पस्थितीत मुलींच्या शाळेत काम करण्यासाठी साठी दुसरा शिक्षक मिळविणेही त्यांना कठीण गेले. तेव्हा ज्योतीबांनी आपली अशिक्षित पत्नी सावित्रीबाई फुले यांना प्रथम घरीच लिहिण्या-वाचण्यास शिकविले आणि त्यांची शिक्षिका म्हणून नेमणूक केली. खरंतर आपल्या अशिक्षित पत्निला ज्योतीरावांनी पहिली भारतीय शिक्षिका घडविली असेच म्हणता येईल. ही गोष्ट अर्थातच पुण्यातील सनातन्यांना रुचली नाही त्यांनी सावित्रीबाईंचा नाना प्रकारे छळ केला.
सावित्रीबाईच्या अंगावर शेण-चिखल फेकण्यापर्यंतही काही नराधमांची मजल मारली. पण त्या माऊलीने आपल्या पतीप्रमाणेच स्वत: चे कार्य निष्ठेने चालू ठेवले.

**विधवा पुनर्विवाह:-**

जोतीबा फुले ब्राम्हणब्देष्टे होते असे म्हटले जाते. परंतु समाजातील कोणत्याही घटकावरील अन्यायाने त्यांचे मन सून्न व्याकूळ होत असे. त्या काळी ब्राम्हण समाजात विधवा स्त्रीयांचे फार हाल होत असत हे पाहून त्यांचे मन अस्वस्थ झाले स्त्रियांचे हाल थांबवावे त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून जोतीबांनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला त्यांनी इ. स. १८६४ मध्ये पुण्यातील गोखल्यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

**बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थापना : -**

विधवा स्त्रियांवर आणखी एक प्रकारच्या आपत्तीला तोंड देण्याचा प्रसंग काही वेळा ओढवत असे. एखाद्या विधवा स्त्रीचे तारूण्य सुलभ भावनांच्या आहारी गेल्याने चुकून वाकडे पडले आणि त्यातून हिला दिवस गेले तर अशा वेळी तिच्यापुढे भृणहत्तेशिवाय पर्याय उरत नाही. अशा दुदैवी स्त्रियांवरील अनवस्था प्रसंग टाळावा म्हणून इ.स. १८६३ मध्ये महात्मा फुल्यांनी स्वतःच्या घरीच बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. या ठिकाणी बाळंतपणासाठी येणान्या विधवा स्त्रियांच्या मुलांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी स्विकारली इतकेच नव्हे तर एका काशीबाई नावाच्या ब्राम्हण विधवेच्या पोटी जन्माला आलेल्या यशवंत नावाच्या मुलास स्वत: दत्तक घेतले .

**अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य :-**

महाराष्ट्रात अस्पृश्यता ही वंश परंपरेने चालत आलेली अत्यंत वाईट प्रथा होती. १९ व्या शतकात ती तीव्र होती. उच्चवर्णीयाकडून अस्पृश्याना अत्यंत हिन वागणूक दिली जात होती. समाजजीवनात त्यांना कोणतेही स्थान नव्हते. अशा कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता दूर करण्यासाठी त्यांना गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसुड, ब्राम्हणाचे कसब इत्यादी ग्रंथ काव्ये अशी उपयुक्त पुस्तकेही लिहली व त्यात वर्णव्यवस्था हा हिंदू धर्माला लागलेला कलंक आहे तो दूर करण्याचे कार्यही जोतीबांनी हाती घेतले होते.

**सत्यशोधक समाजाची स्थापना:-**

महात्मा फुले हे समाज सुधारक म्हणून ओळखले जात असले तरी वरवरच्या सुधारणांवर त्यांचा विश्वास नव्हता सामाजिक विषमता अन्याय व शोषण यांवर आधारलेल्या प्रचलित समाजव्यवस्थेलाच त्यांना विरोध होता. आपल्या धर्म, तत्वज्ञान, साहित्य, इतिहास इत्यादी विषयक चिकित्सक पध्दतीने विवेचन करून लोकांना त्यातील गौरवास्पद भाग दाखविला जाऊ लागला. सामाजिक कर्तव्याची जाणिव करून दिली. सामाजिक सुधारणेसाठी शुद्रातिशुद्रांची स्थिती सुधारण्यासाठी दि. २३ सप्टेंबर १८७३ रोजी म. जोतीराव फुले यांनी **"सत्यशोधक समाजा"** 'ची स्थापना केली. त्यांच्या कार्याला न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, डॉ. रा. गो. भांडारकर, इत्यादी बाह्मण मंडळींनी सक्रिय पाठिंबा दिला. म. फुले यांनी सत्यशोधक समाजातर्फे 'सर्वसाक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्थी' अशी घोषणा करून कार्याला प्रारंभ केला.

म. जोतीराव फुले यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथात धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा सर्वंकष गुलामगिरीचे वास्तव उघड केले. त्यातच सत्यशोधक समाजाच्या स्थापनेची बीजे आहेत. त्याची प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे होती-

१) देव आणि भक्त यांच्यात मध्यस्थाची गरज नाही. अंधश्रद्ध लोकांना धार्मिक गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे. धर्माचा धाक दाखवून भटभिक्षुक अडाणी जनतेची पिळवणूक करतात, ती थांबविली पाहिजे.

२) सावकार आणि जमीनदार यांच्या मगरमिठीतून शेतकऱ्यांची सुटका केली पाहिजे.

३) सर्वांना शिक्षण मिळावे, म्हणून प्रयत्न केले पाहिजे.

वरील तीन तत्त्वांच्या पायावर सत्यशोधक समाजाची चळवळ उभी राहिली. 'विवाह' हा धार्मिक विधी नसून करार आहे, अशी भूमिका म. जोतीराव फुले यांनी घेतली त्यातून इ.स. १८८० पासून नव्या विवाहपद्धतीला प्रारंभ झाला.

यांमागे धार्मिक व सामाजिक गुलामगीरी नष्ट करणे हे या सत्यशोधक समाजाचे मुख्य उद्दिष्टे होते. सार्वजनिक सत्यधर्म व गुलामगिरी या दोन पुस्तकात जोतीबांनी सत्यशोधक समाजाबद्दलचे आपले विचार मांडले आहे. सत्यशोधक समाज ही समाजासुधारणेची महाराष्ट्रातील पहिलो चळवळ होय.

**शेतकऱ्यांचे कैवारी :-**

हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे. देशाची समृध्दी व भरभराट शेतक-यांवर अवलंबून असते असे असले तरी भारतीय शेतकरी सुखी व समाधानी नव्हता. मागसलेपणा अज्ञान, कर्जबाजारीपणा, दारिद्रय यामुळे भारतीय शेतकरी पिचलेला होता . शेतकऱ्यांची गाऱ्हाणे परखडपणे मांडणारे महाराष्ट्रातील समाज चिंतक होते. शिक्षणाशिवाय या कष्टकरी समाजाची स्थिती सुधारणार नाही हे त्यांनी ओळखले. त्यासाठी त्यांनी शिक्षणाचा पुरस्कार केला शेतकऱ्यांच्या आसूड या ग्रंथात शिक्षणा अभावी समाजाची कशी दुर्दशा झाली आहे. शेतकऱ्यांच्या हिताची चिंता त्यांना कशी होती हे इ.स १८८८ मधील **"डयूक ऑफ कॅनाट"** यांच्या भारत भेटीवरून दिसून येते वरील प्रमाणे मुदयाचा स्पष्टीकरणातून आपल्याला निदर्शनास येते की, याहीव्यतिरिक्त शिक्षण विषयक कार्य, धर्म विषय, राजकीय विषय, साहित्य विषयक तसेच मुलगामी समाज क्रांतीचा विचार मांडल्याचे आपल्या लक्षात येईल . अशा रितीने जागृती, कृती, संघटन आणि संघर्ष अशा अनेक मार्गांनी महात्मा जोतीराव फुले यांनी समाज परिवर्तनाचे कार्य केले.

**महात्मा फुलांच्या समाज परिवर्तन लढयातील सहकारी:-**

मुशी गुफ्फार बंग आणि लिजिट साहेब यांच्यामुळे ज्योतीराव पुन्हा शाळेत जावू लागले लहुजी वस्ताद साळवे हे जोतीरावांचे व्यायाम गुरु होते. ते मातंग समाजातील होत आणि रानबा महार या दोघांनी ज्योतीबांच्या शाळेत बरीच मुले मुली दाखल केली. तात्यासाहेब भिडे या ब्राम्हण गृहस्थानी आपला वाडा शाळेसाठी दिला. ज्यावेळी महात्मा फुले घराबाहेर पडले त्यावेळी उस्मान शेख ह्या मुसलमान मित्राने त्याना आपले घर राहायला दिले, भांडी कुंडी दिली. डॉ विश्राम रामजी घोले इ.स. १८७५ सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष झाले. त्यांनी महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्य धर्म या ग्रंथाची प्रस्तावना लिहिली. मोरो विठ्ठल वाळवेकर, गोपाळ बाबा बलंगकर, धोंडीराम नामदेव कुंभारे, ग्यानोबा कृष्णाजी ससाने , कृष्णराव पांडुरंग भालेकर, नारायणराव मेघाजी लोखंडे या मंडळीनी महात्मा फुले यांना मदत केली. व समाज परिवर्तनाचे कार्य केले.

**सारांश :-**

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातील बहुजन समाज अज्ञान अंधकारातच चाचपडत होता. त्यांची चारही बाजूंनी ब्राम्हणांनी कोंडी केली होती . इंग्रजी सत्ता आल्यानंतर या ठिकाणी सामाजिक परिवर्तनाला चालना मिळाली होती, असे असले तरी त्याचा लाभ प्रामुख्याने उच्चवर्णियांनाच झाला आहे. अशा परिस्थितीत बहुजन समाजाचे प्रबोधन करून त्यांना जागृत करून आपल्या न्याय हक्क व संघर्ष करण्याची शिकवण महात्मा फुले यांनी दिली. अस्पृशांची समाजातील दयनीय अवस्था पाहुन महात्मा फुले यांचे अंतकरण भरून आले. त्यामुळे त्यांनी बहुजन समाजाचे वैचारिक प्रबोधन घडवून आणण्याचे कार्य केले . प्रथम त्यांनी बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्व पटवुन देवून शिक्षण हा सर्वांचा मानवी हक्क सांगितले व कार्यप्रवृत केले. बहुजन समाजातील स्त्रियांची दयनिय अवस्था व त्यांच्यावर होणाऱ्या या अत्याचाराचे कारण व त्यांच्या विकासासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे शिक्षणाचा अभाव होय. हे महात्मा फुले यांनी अतिशय तळमळीने ओळखले व एकोणविसव्या शतकात म. जोतीराव फुल्यांनी आपल्या कार्याला शिक्षण प्रसारापासून प्रारंभ करून त्यांनी 'सत्यशोधक समाज' आणि शेवटी 'सार्वजनिक सत्यधर्मा' पर्यंत मजल मारली. त्यांनी केलेले प्रबोधन बहुजन समाजाच्या सर्वांगीण जागृतीसाठी व उन्नतीसाठी अत्यंत उपकारक ठरले.

एकंदरीत धर्मसंस्थेतील दलालांचे उच्चाटन करण्याचा म. फुले यांचा कृति-कार्यक्रम, स्वर्ग-नरकाच्या संकल्पनांतील बुळेपणा उघड करणे आणि नैवेद्य, मंत्र जागराने ईश्वरोपासनेचा मार्ग अवलंबिल्याने होणारे शोषण उघडे करणे हे म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे महत्वाचे योगदान होते. पिढीजात श्रेष्ठता वा पावित्र्य न मानता विवेकाधिष्ठित विचारांना प्राधान्य देणे, स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य जोपासणे, जातीप्रथा मोडणे हा महात्मा
फुल्यांचा पुरोगामी विचार आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया प्रशस्त करणारा ठरला. असेच आपल्याला म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ -**

१. कीरधनंजय - महात्मा ज्योतिबा फुले - पाप्युलर प्रकाशन मुंबई.

2. फडके य.दि. - महात्मा फुले समग्र वांड.मय

3. महात्मा फुले गौरव ग्रंथ, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले काळ व कर्तृत्व. २००६

४. विद्युत भागवत, - स्त्री शिक्षणाची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने - प्रतिमा प्रकाशन पुणे. २००९

५. डॉ. रामकृष्ण साबळे - महात्मा फुले आणि आधुनिक महाराष्ट्र - कैलाश पब्लीकेशन औरंगाबाद.

6. चौधरी, प्रा. कृष्णा - महात्मा ज्योतीराव फुले पूर्वसुरी आणि प्रभावळ, त्रचाप्रकाशन, नागपूर २००५

7. आधुनिक भारताचे विचार स्तंभ – ले रामचंद्र गुद्य (अनुवाद ; शारदा साठे ) – रोहन प्रकाशन पुणे २०१८